**पुणे महानगरपालिका**

**महिला व बाल कल्याण समिती**

**कार्यपत्रिका क्र. २२**

**महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार, दिनांक १४/३/२०१८ रोजी सकाळी ११=३० (साडे आकरा ) वा. महात्मा ज्योतिबा फुले सभागृह (स्थायी समिती सभागृहात) भरेल.**

**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

**विषय क्र. २०६**

**मा. पृथ्वीराज सुतार यांचे दि. १.३. २०१८ चे पत्र**

पुणे शहराचा मनपा हद्दीमध्ये नागरिक अनेक प्रकारचे पाळीव प्राणी वैयक्तिकरित्या पाळतात. (उदा. मांजर, कुत्रा व इ.) या प्राण्यांचे पालन पोषण करीत असतांना नागरिकांनी वैयक्तिक रित्या किती प्राणी पाळावेत याचे काहीही नियम नाहीत.

एक पाळीव प्राण्यांपासून ते शेकडो पाळीव प्राण्यांपर्यंत हे पालन पोषण केले जाते. व हे सर्व प्रकारच्या रहिवाशी भागांमध्ये (उदा. वस्तीभाग,अपार्टमेंट,सोसायट्या, बंगले इ.)

एक दोन पेक्षा अधिक पाळीव प्राणी त्या त्या घरामध्ये असल्यास (त्यांच्या स्वच्छतेबाबत, आवाजाबाबत, भुंकण्याबाबत नागरिकांच्या तक्रारी लोकप्रतिनिधी, मनपा, पोलिस स्टेशन पर्यंत येत असतात. काही ठिकाणी तर मारहाण करण्यापर्यंतचे प्रकार घडलेले आहेत. यावर काहीच नियमावली नसल्यामुळे सर्वांनाच अडचणींना सामोरे जाऊन नागरिकांना मोठा मनस्ताप होत असतो.

तरी महानगरपालिकेने रहिवाशी भागांमध्ये वैयक्तिकरित्या किती व कोणते पाळीव प्राणी पाळावेत. तसेच त्यांच्या आरोग्याशी निगडीत काय उपाययोजना कराव्यात याबाबत धोरण व नियमावली बनविण्याबाबत योग्य ती कार्यवाही सुरु करावी.

**विषय क्र. २०७**

**मा. सौ.मानवी देशपांडे व मा.सौ.कविता वैरागे यांचे दि. ३.३.२०१८ चे पत्र**

बिबवेवाडी सं.नं.५७२ येथील शौचालय रस्तारुंदीत बाधीत होत असल्याने सदर ठिकाणाहून शौचालय हलवून स.नं.५७७ ,खिंडीपाशी स्थलांतरीत करण्यात यावे .

**विषय क्र. २०८**

**मा.हिमाली नवनाथ कांबळे व मा.श्रीमती लता राजगुरु यांचे दि. ८.३. २०१८ चे पत्र**

प्रभाग क्र.२१ मधील वाडीया कॉलेजच्या समोर असलेल्या माता रमाबाई आंबेडकर उद्याना शेजारी असलेली मुतारी काढून अन्य ठिकाणी तातडीने हलविण्यात यावी.

सदर उद्यानात माता रमाबाई आंबेडकर यांचा पुतळा बसविण्यात आलेला आहे. सदर पुतळ्याच्या दर्शनासाठी अनेक अनुयायी येत असतात . त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्यांना सदर मुतारीचा वास येत आहे. तसेच परिसरामध्ये दुर्गंधी पसरत आहे.

तरी सदरील मुतारी तातडीने अन्य ठिकाणी हलविण्यात यावी.

**विषय क्र. २०९**

प्रभाग क्र.६ मधील कामराजनगर वाघिरे समाज मंदिराजवळील जुने,जीर्ण व बंद असलेले शौचालय पाडणेबाबत मा.संजय भोसले,गटनेते शिवसेना यांचे दि.५.४.२०१७ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती ठ.क्र.१७, दि.११.५.२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी जा. क्र.मआ / प्र.क्र.१/११४०, दि.७.३..२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी .

विषय क्र. २१०

शहरी गरीब वैद्यकीय सहाय योजने अंतर्गत पॅनेलवरील प्रायव्हेट हॉस्पिटल मधील अंर्तरुगण विभागातील वैद्यकीय उपचारांसाठी,सी.जी.एच.एस. मान्य दराने ५०% हमी पत्रांतर्गत र.रु.एक लाख या कमाल मर्यादेऐवजी १००% वाढीने र.रु.दोन लाख या कमाल मर्यादेपर्यंत आर्थिक लाभ मिळणेबाबत मा. योगेश समेळ व मा.संदिप जऱ्हाड यांचे दि.२१.११.२०१७ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती ठ.क्र.१५२,दि. २२.११.२०१७ ला अनुसरुन मा.प्र.महापालिका आयुक्त यांनी जा.क्र. मआ/ आरोग्य/ ११४७, दि.७.३..२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी .

विषय क्र. २११

त्वचारोग तज्ञ,एडस,नोडल ऑफिसर,मेडिकल ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर, कार्डिओलॉजिस्ट/ हृदयरोग तज्ञ, न्यायवैद्यकशास्त्र/वैद्यकीय अधिकारी (न्यायवैद्यकशास्त्र), नेत्र शल्यचिकित्सक/ नेत्रतज्ञ, रक्तसंक्रमण अधिकारी (वर्ग १) (वेतनश्रेणी–१५६००–३९१००+ ग्रेड पे ६६००) या पदावरील नेमणूकीबाबतचे मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/उआ(साप्र) आस्था/७९३, दि. ९/१/२०१८ चे पत्र.

**( टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते )**

विषय क्र. २१२

पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग व डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी ), २८ क्वीन्स गार्डन, जुन्या सर्कीट हाऊसजवळ, पुणे ४११००१ यांचे संयुक्त सहकार्याने कौशल्य विकासाचे प्रशिक्षण आयोजित करणेबाबतचे मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/ स.वि.वि./ ८२८, दिनांक १६/१/२०१८ चे पत्र.

**( टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते )**

विषय क्र. २१३

पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग व मिटकॉन सेंटर फॉर सीएसआर ॲण्ड स्किल डेव्हलपमेंट, शिवाजीनगर, पुणे यांचे संयुक्त सहकार्याने कौशल्य विकासाचे प्रशिक्षण आयोजित करणेबाबतचे मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/स.वि.वि./८३०, दिनांक १६/१/२०१८ चे पत्र.

**( टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते )**

विषय क्र. २१४

पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग व श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (SNDT ) निरंतर व प्रौढ शिक्षण व विस्तार विभाग, पुणे उपकेंद्र कर्वे, पुणे ३८ यांचे संयुक्त सहकार्याने कौशल्य विकासाचे प्रशिक्षण आयोजित करणे बाबतचे मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/स.वि.वि./८३७, दिनांक १६/१/२०१८ चे पत्र.

**( टिप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले होते )**

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**